ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 9 | October - 2016

Indian Streams Research Journal

# प्राचीन भारतातील शिक्षणपध्दती व विद्यापीठे

**प्रा.डॉ. भामरे नानाजी दगा**
इतिहास विभाग प्रमुख , विद्या विकास मंडळाचे , कला व वाणिज्य महाविद्यालय, अककलकुवा लि. नंदुरबार.



## प्रस्तावना :-

`शिक्षण हा मानवाचा तिसरा डोळा आहे` ही प्राचीन भारतीयांना समज होती. "स्वदेश पुज्यते राजा विद्वान सर्वत्र पुज्यते" राजाला स्वदेशातच मान सन्मान असतो, स्वतःच्या राज्याबाहेर त्याला कोणी विचारत नाही, मात्र विद्वानाला सर्वत्र मान सन्मान मिळतो.म्हणून भारतीयांनी शिक्षणाला चांगले महत्व दिले होते. प्राचीन भारतीयांनी उत्कृष्ट वाङःमय निर्मान केले होते हा प्राचीन भारतीय शिक्षण पध्दतीचा पुरावा आहे.या देशात पुर्वी ऋषीमुनी होऊन गेलेत त्यांनी शिक्षणाचाच पाठपुरावा केला. ज्ञानसाधना हेच त्यांचे जीवन होते. यामध्ये स्त्रीयाही मागे नव्हत्या.गार्गी, मैत्रेयी, लोपामुद्रा,विश्ववरा, सिकाता, निवावरी, गोधा, घोषा, अदिती अशा अनेक स्त्रीया शिक्षणात विद्वान पंडित होऊन गेल्या.[१]

## प्राचीन शिक्षण व्यवस्था :-

### १) शिक्षणचा हेतू :-

भारतीयांनी आपल्या शिक्षणाचे ध्येय, ज्ञानसाधना, शील, व्यक्तीमत्व विकास,व सामाजिक वारशाचे संरक्षण असे चतुर्विध कार्ये ठेवले होते.या ध्येयाला अनुसरुन शिक्षण पध्दती निर्माण झाली होती. विद्याहीन मनुष्य पशू आहे.विद्या ही कल्याणाची गुरुकिल्ली आहे व कामपूर्ती करणारी कल्पकता आहे. असा विद्येचा गौरव केला आहे. शिक्षणामुळे देवऋण, गुरुऋण आणि पितृऋण या तीन ऋणापैकी गुरुऋण हे सतत ज्ञानोपसना करुन फेडता येते. शिक्षणामुळे नम्रता, सहनशीलता व संयमी वृत्ती निर्मान होते.[२] व्यक्ती चारित्र्यसंपन्न निर्मान होण्यासाठी मदत मिळते.

### २) गुरुकुल :-

प्राचीन भारतात ज्ञानदानाचे कार्ये आश्रमातून म्हणजेच गुरुकुलातून दिले जात होते.गुरुकुलात विद्वान ब्राम्हण ज्ञानदानाचे कार्य करत होते. ही गुरुकुले गावापासून खूप लांब सहसा वनात राहत होती. छात्र हा सात-आठ वर्षाचा झाल्यावर त्याची मुंज केली जात असे. मुंज झाल्यावर त्याला आश्रमात प्रवेश मिळत असे. तेथे त्याची राहण्याची, जेवण्याची सारी सोय राहत असे. गुरुकुलात शिक्षण घेतांना शिष्याला गुरुची सारी कामे करावी लागत होती. शिष्याने गुरु उठण्यापुर्वी प्रातःकाली लवकर उठावे गुरुच्या घरातील सर्व कामे स्वतः करावी. गुरुच्या घराची जनावरे चारुन आणणे. त्यांना पाणी पाजणे. घरी स्वयंपाकासाठी लाकडे आणणे इत्यादी कामे करावी लागत असे. सर्व कामे आटोपल्यानंतर गुरु शिष्याला ज्ञान देत असे.गुरु प्रथम श्लोक किंवा सुत्र म्हणत असे.त्यापाठोपाठ शिष्याने म्हणावे ते पाठांतर करावे . लिहिण्याची प्रथा फारशी प्रचलित नव्हती. शिष्याला शिकवलेल्या भागावरती गुरु परिक्षा घेत असे.

### ३) अभ्यासक्रम :-

आश्रमात वेदांचे मोठया प्रमाणात शिक्षण दिले जात होते. वेदांचा अर्थ लावण्याची त्या त्या गुरुवरती अवलंबून होती. वेदानंतर सहा वेदांगे म्हणजेच व्याकरण, छंदशास्त्र, निरुक्त, ज्योतिष, शिक्षा, कल्प शिवले जात होते. याचबरोबर काव्यशास्त्र, धर्मशास्त्र, बिजगणित, भूमीती, चौसष्ट कला, धनुर्विद्या, भूतविद्या, देवविद्या, विषविद्या, राशीविद्या इत्यादी विषयांचे शिक्षण दिले जात होते.तसेच शास्त्रीय विद्यामध्ये वैद्यकशास्त्र,अर्थशास्त्र,खगोलशास्त्र, ज्योतिशास्त्र, राजनिती,युध्दशास्त्र,दंडशास्त्र,नितीशास्त्र यासारखे विषय शिकवले जात असे.सर्वांना शिक्षण मोफत राहत असे. शिक्षण देतांना गरीब श्रीमंत असा भेदभव केला जात नसे. शिक्षण संपल्यावर समावर्तनाचा समारंभ होत असे. दुसऱ्या

आश्रमातील ऋषी येवून विद्यार्थ्यांची परिक्षा घेत असे. विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यावर त्याला पदवी देण्याचा समारंभ होत असे. त्यालाच समावर्तन संस्कार असे म्हणत होते.[४]

### ४) शिक्षण पध्दती :-

संबधीत ज्ञान घेणाऱ्या शिष्याने सकाळी लवकर उठावे स्नानसंध्या आटोपल्यावर अध्ययनाला प्रांरभ होत असे. अध्ययन हे मुखोद्‌गत पध्दतीने चालत असे. गुरु प्रथम श्लोक किंवा सुत्र म्हणत असे. त्यापाठोपाठ विद्यार्थी म्हणत असे. त्याचबरोबर विद्यार्थ्याने स्मरण करावे. दुसऱ्या दिवशी तेच गुंरुना पुन्हा म्हणून दाखवावे लागत असे. अधूनमधून गुरु विद्यार्थ्याला शिकविलेला विषय कितपत समजला याची परिक्षा घेत असे. दुपारपर्यंत शिक्षण दिले जात होते. त्यानंतर विश्रांती राहत होती. विश्रांतीनंतर पुन्हा अध्ययनाची प्रक्रिया सुरु होत असे ते सांयकाळपर्यंत चालत असे. त्यानंतर शिष्य गुरुगृहाची कामे करत असे. सांयकाळी भोजनानंतर रात्री गुरुबरोबर अनेक विषयांवर चर्चा केली जात होती. शिष्य गुरुला काही शंका विचारत असे. चर्चा संपल्यानंतर झोपत असत. अशारीतीने एका दिवसाचे वेळापत्रक ठरलेले राहत असे. [५] तसेच विद्यार्थ्याला अमावस्या व पोर्णिमेच्या दिवशी सुट्टी मिळत होती. याशिवाय आश्रमात सुख:दुख, सण-उत्सव प्रंसगी अध्ययनास सुट्टी मिळत होती.प्रत्येक आश्रमाच्या सुट्ट्या वेगवेगळया राहत होत्या.

प्राचीन भारतीय शिक्षण पध्दतीचे वैशिष्टे म्हणजे विद्यार्थ्याची विचारशक्ती जागृत करणे हे होय. गुरु विद्यार्थ्याला प्रश्न विचारीत आणि मुळ प्रश्नातून उपप्रश्न निर्माण करीत होते. त्या साऱ्या प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्याला द्यावी लागत होती. त्यामुळे आपोआपच विद्यार्थ्याची आकलनशक्ती व विचारशक्ती जागृत होत असे. त्यातून विद्यार्थ्याला स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता निर्मान होत असे.[६]

### प्राचीन भारतातील विद्यापिठे :

प्राचीन भारतात अनेक विद्यापीठे स्थापन झाली होती. या विद्यापीठांमध्ये शिक्षणाचा स्तर अतिशय उच्च दर्जाचा होता. याचे पुरावे म्हणून चिनी प्रवाशांच्या प्रवास वर्णनावरुन दिसून येते. त्या काळातील विद्यापीठे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १) तक्षशिला विद्यापीठ :-

तक्षशिला विद्यापीठ हे भारतातील सर्वात जुने विद्यापीठ आहे. या विद्यापिठाचा उल्लेख रामायण, महाभारत यासारख्या ग्रंथात आहे. तक्षशिला ही गांधार देशाची राजधानी होती. या विद्यापीठात अनेक पांरगत विदवान आचार्य ज्ञानदानाचे कार्य करत होते. या ठिकाणी परदेशातील अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी येत होते. विद्यार्थ्यांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था विद्यापीठातच केलेली होती. हे विद्यापीठ राजनिती व शस्त्रविद्येसाठी प्रसिध्द होते. एकाचवेळी शस्त्रविद्या विभागात १०३ राजपूत्र शिक्षण घेत असल्याचा उल्लेख आढळतो.[७] आयुर्वेद व व्यायामशास्त्राचे विशेष शिक्षण येथे दिले जात होते. अनेक प्रसिध्द महापुरुष या विद्यापीठात शिक्षण घेत होते. त्यामध्ये प्रसिध्द व्याकरण कर्ता पाणिनी गौतम बुध्दांच्या समकालीन कोसलचा राजा प्रसेनजीत, मल्ल सरदार बंधूल, लिच्छवी घराण्यातील महाली, आर्य चाणक्य विद्यार्थी व शिक्षक याच विद्यापीठात होते.येथील विद्यापीठात वेद,वेदांगे,व्याकरण, वैद्यक, स्थापत्य, धनुर्वेद इत्यादी अठरा मुख्य विषय शिकवले जात होते. गरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले जात होते. श्रीमंत विद्यार्थ्यांकडून एक हजार सोन्याची नाणी इतके शुल्क घेतले जात होते. विद्यार्थ्याला त्याच्या आवडीप्रमाणे कोणताही विषय घेता येत होता. हे विद्यापीठ इ.स. पुर्व ८०० ते इ.स. ४०० या कालखंडात होते.या विद्यापीठाने अहोरात्र ज्ञानदान केले. या विद्यापीठाचा नाश भारताबाहेरील रानटी टोळयांनी केला.[८]

### २) नालंदा विद्यापीठ :-

**अ) स्थापना :-** हर्षवर्धनाच्या कालखंडात बिहारमध्ये नालंदा विद्यापीठ नावारुपाला आले होते. प्रारंभी हे विद्यापीठ विहाराच्या स्वरुपात होते. या विहाराला अनेक रांजानी देणग्या दिल्या.गुप्त वंशातील पहिला कुमारगुप्ताने या विहारास फार मोठी देणगी दिली. त्यामुळे त्याचे रुपांतर विद्यापीठात झाले.त्याने पुढे मोठी प्रगती केली. आणि ते आंतरराष्ट्रीय विद्यापीठ झाले.[९]

**ब) विशाल व भव्य इमारती :-** नालंदा विद्यापीठाची इमारत विस्तृत व भव्य होती. हयुएनत्संगाच्या प्रवास वर्णनात नालंदा विद्यापीठाचे व त्याच्या इमारतींचे वर्णन कलेले आहे. विद्यापीठाच्या सभोवताली विटांचा परकोट होता. परकोटाला प्रवेशद्वार असून आत अनेक इमारती होत्या. इमारतींचे सुदंर स्तंभ होते. विद्यापीठात अनेक महाविद्यालये होती. त्यांच्या वेगवेगळया इमारती होत्या. इमारती चार चार मंजली होत्या. त्या सुविधानी परिपुर्ण होत्या. पुरोहित व आचार्यासाठी खास निवासाची व्यवस्था होती. इमारतींच्या भिंती, स्तंभ इत्यादी अंलकृत असून उत्तमरीतीने सजविलेल्या होत्या. इमारतींच्या छपरांवर रंगीबेरंगी कौले बसवून विविध रंगी प्रकाश योजना केलेली होती.विद्यापीठाच्या आवारात सुसज्जीत चबूतरे, सुदर उद्याने, स्नानगृहे. क्रिडांगणे इत्यादींची व्यवस्था केलेली होती.[१०]

**क) ग्रंथालये :-** ग्रंथालय हा विद्यापीठाचा आत्मा असतो. नालंदा विद्यापीठीत विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी रत्नसागर, रत्नोदधी व रत्नरंजक अशी तीन मोठी गंथालये होती.

**ड) विद्वान शिक्षक व अनुभवी आचार्य :-** नालंदा विद्यापीठात अनुभवी आचार्य व शिक्षकांचा भरणा होता. १५१० शिक्षक विद्यादानाचे कार्य करत होते.नालंदा विद्यापीठात निरनिराळया देशातून अध्ययनासाठी आलेले विद्यार्थी शिक्षण पुर्ण झाल्यावर येथेच अध्यापन कार्ये करत असत. नालंदा विद्यापीठातील आचार्य अध्यापनासाठी व बौध्द धर्माच्या प्रचारासाठी परदेशात देखील प्रवास करत असत. नालंदा विद्यापीठातील नागार्जून, आचार्यदेव, अंग, शीलभद्र, शंतरक्षित, धर्मपाल, वसुबंधू, चंद्रपाल, जिनमित्र, ज्ञानचंद्र इत्यादी आचार्य ख्यातीचे होते. हयुएनसत्संगाच्या वेळी शीलभद्र हा विद्यापीठाचा कुलगुरु होता.[११]

**इ) प्रवेश व विद्यार्थी:-** नालंदा विद्यापीठ हे श्रेष्ठ दर्जाचे विद्यापीठ होते. या विद्यापीठात प्रवेश देण्यापुर्वी स्पर्धायुक्त परीक्षा घेण्यात येत होती. या परिक्षेत केवळ २० टक्केच विद्यार्थी उत्तीर्ण होत होते. त्यांनाच फक्त प्रवेश मिळत होता. विशेष म्हणजे पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी आपल्या पंसतीचा विषय पांरगत

होण्यासाठी येथे येत होते. वादविवादात पराभूत झालेले विदवान आणि शीघ्र प्रसिध्दी मिळवणारे विभिन्न प्रदेशाचे व शहराचे विदवान आपले अपुर्ण ज्ञान पुर्ण करण्यासाठी नालंदा विद्यापीठात प्रवेश मिळवत होते. सातव्या शतकात या विद्यापीठात १०,००० विद्यार्थी शिक्षण घेत होते. विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण होते.[१३] विद्यार्थी व शिक्षकासाठी राहण्याची, जेवण्याची व औषधपचाराची मोफत व्यवस्था होती.

**विविध विषय :-** नालंदा विद्यापीठात विविध विषयाचे शिक्षण दिले जात हाते. हे विद्यापीठ बौध्द धर्मीय महायान पंथाच्या शिविण्यासाठी प्रसिध्द होते. त्रिपिटके, बौध्द ग्रंथ, साहित्य,तर्कशास्त्र, वेद, वेदांगे, जातक ग्रंथ, योगविद्या,जैन धर्माचे तत्वज्ञान, चित्रकला, शिल्पशास्त्र, मंत्रविद्या, दंडनिती, गणित, वैद्यक ज्योतिष इत्यादी विषयाचे अध्ययन व अध्यापन केले जात होते.या विद्यापीठात १०,००० विद्यार्थी व १५१० शिक्षक होते. म्हणजेच सहा विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक असे प्रमाण दिसून येते.[१४]

**विद्यापीठाला येणारा खर्च :-** नालंदा विद्यापीठासाठी येत असलेला खर्च हा राजे, सरदार व इतर श्रीमंत लोकांकडून उदार देणग्या व विद्यापीठाच्या मालमत्तेतून केला जात होता. गुप्त, हर्ष व पाल या राजांनी विद्यापीठास मोठमोठया देणग्या दिल्या. विद्यापीठाजवळ फार मोठी जमीन होती. नालंदा प्रदेशाच्या नरेशाने शंभर गावांचे उत्पन्न या विद्यापीठाच्या खर्चासाठी दिले होते. हयुएनस्त्संगाच्या मतानूसार या विद्यापीठाजवळ अन्नधन्यासाठी जमीन व दुधदुभत्यासांठी जनावरे देखील होती.

नालंदा विद्यापीठ हे विद्या व विद्वानांचे माहेरघर बनले होते. या विद्यापीठावरती १२०३ मध्ये बख्तियार खिलजीने आक्रमण केले व हे विद्यापीठ नष्ट केले.[१५]

### ३) वल्लभी विद्यापीठ :-

काठेवाडात राजधानीचे शहर व प्रसिध्द बंदर म्हणून त्या काळात विख्यात होते. गुप्त सम्राटांचा सेनापती भट्टारक याने सहाव्या शतकात या विद्यापीठाची स्थापना केली. भट्टारक त्यांचे वंशज मैत्रक राजे होऊन गेलेत त्यांनी बौध्द धर्मास मोठया प्रमानावर राजाश्रय दिला. त्यामुळे या भागात अनेक बौध्द विहार स्थापन होऊन मोठया प्रमानात ज्ञानदानाचे कार्य सुरु झाले. हयुएनत्संग सातव्या शतकात जेंव्हा येथे आला तेंव्हा त्यांना याठिकाणी शंभर बौध्द विहार असल्याचे आढळून आले होते. नालंदा विद्यापीठासारखेच समान अभ्यासक्रम या विद्यापीठात आढळून आला होता. स्थिरमती व गुणमतीसारख्या प्रसिध्द बौध्द आचार्यानीं या विद्यापीठामध्ये ज्ञानदान केल्यामुळे हे विद्यापीठ लवकर नावारुपाला आले.इतर विद्यापीठाप्रमाणे अनेक परदेशी विद्यार्थी या विद्यापीठात होते.[१६]

वल्लभी विद्यापीठात एकून ७२ विषय शिकवले जात होते. त्यामध्ये गणित, ज्योतिष, व्याकरण, लेखणकला, धनुर्विद्या, मंत्रविद्या, यंत्रविद्या, स्थापत्यशास्त्र यासारखे विषय शिकवले जात होते. या ठिकाणी बौध्द धर्माचे शिक्षण दिले जात असे. त्याचबरोबर जैन धर्माच्या अभ्यासाचे हे प्रमुख केंद्र होते. अनेक श्रीमंतानी या विद्यापीठाला मदत दिलेली आहे. येथे एकून सहा हजार विद्यार्थी शिक्षण घेत होते. या विद्यापीठात सर्व मोफत शिक्षण दिले जात होते. प्रवेश देण्यापुर्वी विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावी लागत होती. बौध्द धर्मातील हिनयान पंथाचे हे एक प्रमुख विद्यापीठ होते. तेराव्या शतकात हे विद्यापीठ मुस्लीम आक्रमणामुळे नष्ट झाले.

### ४) काशी (वाराणसी) विद्यापीठ :-

काशी विद्यापीठ हे भारतातील प्रसिध्द विद्यापीठ म्हणून विख्यात होते. याठिकाणी प्रामुख्याने धार्मिक शिक्षण दिले जात होते. येथे वेद व वाङःमयाचा अभ्यास केला जात होता. हयुएनत्संगाच्या प्रवासवर्णनांवरुन येथे १०० हिंदु मंदिरे व ३० बौध्द विहार असल्याचा उल्लेख आढळतो. हिंदु मठातून प्रामुख्याने वैदिक वाङःमय शिकवले जात होते. या विद्यापीठात फक्त उच्च वर्णियानांच प्रवेश होता. बौध्द व जैन विहारात सर्व जातींना व विदवानांना प्रवेश होता. काशी हे धार्मिक चळवळीचे केंद्र होते. येथे अनेक विद्यार्थी गुरुच्या घरी राहत होते व तेथेच त्यांना शिक्षण दिले जात असे. प्रसेनजीत, बिंबीसार इत्यादी राजांनी या विद्यापीठास मदत केल्याचे दिसून येते.[१७]

### ५) कांची विद्यापीठ :-

उत्तर भारताप्रमाणेच दक्षिण भारतातही ज्ञानदानाचे पवित्र कार्य चालू होते. कांची , मदूरा इत्यादी विद्यापीठे दक्षिण भारतात प्रसिध्द होत्या. उत्तरेला जशी काशी विद्यापीठ होती तशीच दक्षिणेला कांची हे धार्मिक विद्यापीठ होते. या विद्यापीठात अनेक मोठमोठे आचार्य होऊन गेलेत. प्रसिध्द बौध्दाचार्य, नागार्जून याच विद्यापीठातील होते. बौध्द धर्माचा पंडित बुध्दघोष, न्यायभाष्यकर्ता, वात्सायण, दीडगनाग व धर्मपाल यांच्यासारखे अनेक आचार्य विदवान लेखक या विद्यापीठात होऊन गेलेत.[१८]

कांची विद्यापीठ स्थापत्यकलेसाठी अधिक प्रसिध्द होती. दक्षिणेतील जगाला आश्चर्यचकित करुन सोडणारे मंदिरे स्थापत्य म्हणजे याच विद्यापीठाची देणगी होय. या विद्यापीठाने तेराव्या शतकापर्यंत ज्ञान देण्याचे अखंडपणे चालू ठेवले होते.

### ६) मदुरा विद्यापीठ :-

पाचव्या शतकात मदुरा विद्यापीठ प्रसिध्द होती मदुरा हे शहर प्राचीन संस्कृतीचे प्रतीक मानले जाते. ज्याप्रमाणे सिंधु संस्कृती सिंधु नदीच्या किनाऱ्यावर वसली होती त्याप्रमाणे द्रविड संस्कृती वाईगाई नदीकाठी प्रसिध्दीस आली होती. म्हणून द्रविड संस्कृतीचे आगार म्हणजे मदुरा विद्यापीठ होय.

मदुरा शहरात अनेक सुंदर इमारती होत्या. या संदर इमारती बघून भगवान शंकर संतूष्ट झाले.की, त्यांनी या शहरास मधू म्हणजे अमृत शिंपडले. त्यांच्या या कृतीमुळे हे शहर मदूरा किंवा मधूरा या नावाने ओळखले जावू लागले. प्राचीन काळापासून स्थापत्य कलेबाबत हे शहर संपन्न असावे या विद्यापीठात स्थापत्य व शिल्पकला यांचे विशेष शिक्षण दिले जात होते. याठिकाणी मंदिरे द्रविड स्थापत्य कलेची आहेत. या परिसरात अनेक मीनाक्षीची

मंदिरे बांधलेली आहेत. १३१० मध्ये मलिक काफूरने या मंदिरावरती आक्रमणे करुन ही मंदिरे फोडली. त्यानंतर पुन्हा नव्याने ही मंदिरे उभारण्यात आली. या मंदिरांच्या दक्षिणेकडील मनोरा १५२ फुट उंच आहे. या मंदिराला १०० खांब आहेत. इतक्या मोठया खांबाचा विस्तीर्ण मंडप आश्चर्यकारक वाटतो.[१९]

तामिळ संगमाचा आद्य कवी तिरुवल्लर याच मदूराचा रहिवासी होता. तमिळ संगम ही मुळची ४८ विदवानांची सभा होती. पांडये राजांनी या विद्यापीठास मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत केली होती. अनेक विदवानानांही मदत केली होती. स्थळपुराणानुसार राजशेखर पांडये हा राजा ६३ विद्येत पांरगत होता. मदुरा विद्यापीठात स्थापत्य व शिल्पकलेबरोबर नृत्य, संगीत व चित्रकला यांचेही शिक्षण दिले जात होते.

### ७) अयोध्या विद्यापीठ :-

अयोध्या नगरी प्राचीन काळापासून रामाच्या नावाने प्रसिध्द होती. या अयोध्या नगरीत प्राचीन काळी विद्यापीठ होते. या विद्यापीठाची माहिती जैन ग्रंथात मिळते. जैन आचार्य हेमचंद्रसूरी यांचा ग्रंथ त्रिषष्ठी शलाकापुरुषचरित मध्ये या विद्यापीठाची माहिती मिळते.या ग्रंथावरुन अरिहंत वृषभदेव हा या नगरीचा राजा होता. जैन लोक याला जैन धर्माचा पहिला तिर्थकार म्हणतात. त्यांनी पुरुषवर्गाला ७२ व स्त्री वर्गाला ६४ विद्या शिकवण्याची प्रथा निर्माण केली होती. भगवान वृषभदेव राजाने आपला मुलगा सगर याच्या शिक्षणाची व्यवस्था अयोध्या येथे केली होती.या विद्यापीठात अनेक विषय शिकवले जात होते.

अयोध्या विद्यापीठात राजपुत्र सगर हा गुरुगृही राहून ज्ञान घेत होता. व्याकरण, नितीशास्त्र, अर्थशास्त्र, संगीत, नृत्यकला, नाटय, वाघ, लष्करी शिक्षण अशा अनेक विषयात शिक्षण सगर यांनी या विद्यापीठात घेतले होते. यावरुन या विद्यापीठात शिक्षणाची व्यवस्था उत्तम होती असे दिसून येते.[२१]

### ८) गुणशीला विद्यापीठ :-

प्राचीन भारतातील अनेक विद्यापीठापैकी गुणशीला हे एक विद्यापीठ होते.बिहारमध्ये राजगृह नगरीत गुणशीला हे विद्यापीठ होते. या विद्यापीठात मुंलाबरोबर मुंलीही शिक्षण घेत होत्या. बिंबीसाराची पत्नी खेमा, नंदा यांच्याबरोबर अनुपमा, धम्मा, सुजाता या स्त्रीयांनीही शिक्षण घेतले होते. या विद्यापीठात ६४ विष्याचे शिक्षण दिले जात होते.त्यामध्ये गीत, वाद्ये, नाटय, नृत्य अशा अनेक विषयांचा समावेश होता. प्राचीन भारतात स्त्रीयांना शिक्षण देणारे विद्यापीठ म्हणून या विद्यापीठाचा उल्लेख केला जात होता.[२२]

### ९) कुंडीणपूर विद्यापीठ :-

कुंडीणपूर हे गाव पाटलीपुत्रापासून २७ मैलावर वैशालीच्या राज्यात पसरलेले होते. या विद्यापीठात प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा द्यावी लागत होती. याचा संदर्भ जैन ग्रंथ कल्पसूत्र व नवतत्व या ग्रंथात आढळते. या विद्यापीठात वेद, इतिहास, तत्वज्ञान, गणित, व्याकरण, ज्योतिष इत्यादी विषयाचे शिक्षण दिले जात होते.जैनांचे २४ वे तिर्थकार महावीर यांचे शिक्षण या विद्यापीठात झाले होते.

कुंडीणपूर या विद्यापीठात व्यायामाचे शिक्षण दिले जात होते. भगवान महावीरांचे पिता सिध्दार्थ या ठिकाणी व्यायाम करत होते. व्यायाम करण्यासाठी जी उपकरणे लागत होती त्या सर्वांचा संग्रह या विद्यापीठात होता. व्यायाम केल्यानंतर थकवा काढण्यासाठी संर्वागाला मालिश करुण घेण्याची प्रथा होती. हा उल्लेख बाणभट्टाच्या कांदबरी या ग्रंथात आहे.भारतात व्यायामशास्त्राचे अध्यापन करणारे कुंडीणपूर विद्यापीठ हे आगळे वेगळे विद्यापीठ होते.[२३] या विद्यापीठाद्वारे व्यायामातून आरोग्याचे रक्षण केले जात होते.

### सांराश :-

प्राचीन भारतात वरील विद्यापीठांप्रमाणे धान्यकटक, वंगी, श्रीपर्वत इत्यादी अनेक विद्यापीठे ज्ञानदान देण्याचे कार्य करत होते.प्राचीन भारतीय विद्यापीठातून विद्यार्थ्यांना जे शिक्षण मिळत होते ते आदर्शवत होते. शिक्षणातून मानवाला मानव म्हणून कसे जगावे याचा बोध मिळत होता. आदर्श मानव निर्माण करणे हे या प्राचीन विद्यापीठांचे ध्येय होते. साधी राहणी व उच्च विचारसरणी हे या शिक्षण पध्दतीचे वैशिष्टे होते.परदेशातून अनेक विद्यार्थी या विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी येत होते आणि ज्ञान घेवून ते स्वदेशात परत जात होते. हे या प्राचीन विद्यापीठांचे योगदान होते.

प्राचीन विद्यापीठातून धार्मिक शिक्षणाऐवजी राजनिती, लष्करी, स्थापत्य, आर्थिक, संगीत, व्यायाम इतर अनेक विषयाचे ज्ञान या प्राचीन विद्यापीठातून दिले जात होते. ज्याला ज्या विषयात रुची असेल त्या विषयात त्याला पुर्ण ज्ञान मिळत होते.त्यामुळे व्यक्ती विकासाला पुर्ण वाव मिळत होता. प्राचीन विद्यापीठात गुरु - शिष्य एकत्र राहत होते. त्यामुळे दोघांमध्ये आत्मीयता निर्माण होत असे. ते एकामेकांना समजून घेत होते. गुरु हे सर्व विद्यार्थ्यांना सारखे शिक्षण देत होते. भेदभाव करत नव्हते. समाजात गुरुबद्दल आदर राहत असे. विद्यार्थ्यांचा सर्वागींग व बौध्दीक विकास व्हावा. हे या प्राचीन विद्यापीठोचे ध्येय दिसून येते.

### संदर्भ :-

१) शहा जी.बी. - **प्राचीन भारताचा राजकीय आणि सांस्कृतिक इतिहास,** प्रशांत पब्लिकेशन्स जळगांव, २०१३, पृ.क्रं.३१९.
२) गायधनी र. ना. व राहुरकर व.ग. **-प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास,** कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९९४, पृ. क्रं. ३५८.
३) उपरोक्त - पृ. क्रं. ३५९.
४) उपरोक्त - पृ. क्रं. ३६०.
५) चौधरी राधाकृष्ण - **प्राचीन भारत का राजनीतिक और सांस्कृतिक इतिहास,** भारती भवन प्रकाशन पटना, १९७३,पृ. क्रं. ४७३.
६) शर्मा रीता - **प्राचीन भारत का इतिहास,** बोहरा प्रकाशन जयपूर, १९९६, पृ.क्रं. ३५६.

७) शहा जी. बी. पुर्वोक्त, पृ. क्रं. ३२२.
८) चौधरी राधाकृष्ण - पुर्वोक्त, पृ. क्रं.२४७.
९) शर्मा रीता - पुर्वोक्त, पृ.क्रं. ३५६.
१०) उपरोक्त - पृ. क्रं.३५६.
११) उपरोक्त - पृ. क्रं.३५६-३५७.
१२) देशमुख मा.म.- **प्राचीन भारताचा इतिहास,** विश्वभरती प्रकाशन नागपूर, १९९८,पृ. क्रं.२२८.
१३) मोरवंचीकर रा.श्री.- **प्राचीन भारत**, विद्या बुक्स पब्लिशर्स औरगांबाद, १९९२,पृ. क्रं.२९३.
१४) व्यास गोपाल व माथमर के.सी.- **प्राचीन भारत का इतिहास**, मलिक एण्ड कंम्पनी जयपूर, १९९५, पृ.क्रं. ३५३.
१५) मोरवंचीकर रा. श्री. -पुर्वोक्त,पृ. क्रं.२९३.
१६) गायधनी र. ना. व राहुरकर व. ग. -पुर्वोक्त, पृ. क्रं. २८२.
१७) उपरोक्त - पृ. क्रं.२८२-२८३.
१८) चौधरी राधाकृष्ण - पुर्वोक्त, पृ. क्रं.५८६.
१९) शहा जी. बी. पुर्वोक्त, पृ. क्रं.३३९.
२०) गायधनी र.ना. व राहुरकर व. ग. - पुर्वोक्त, पृ.क्रं. २८२.
२१) देशमुख मा.म. -पुर्वोक्त, पृ. क्रं.१५७.
२२) शहा जी. बी. - पुर्वोक्त पृ. क्रं.२४१.
२३) उपरोक्त -पृ. क्रं.२४३.